मुख्य कार्यालय : स्व.इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प).
ता.जि. ठाणे ४०१ १०१. दुरध्वनी क्र. : २८१९२८२८ / २८१९३०८७

(नगरसचिव विभाग)

क्रमांक :

तारीख :

| विषय | मा. स्थायी समिती सभा दि. १७/१२/२०१२ मुळप्रत |
|---|---|

प्रकरण सुरु झाल्याची तारीख : सन २०१२/१३ स्र. सु. ०१
प्रकरण बंद केल्याची तारीख :

| दिनांक | कार्यवाही |
|---|---|
| | प्रकरण क्र. ०१ — |

१

१२/१३

(नविन बांधी)

## अभिलेखाचे वर्गीकरण

| बाब क्रमांक | वर्ग | परिक्षणाचे वर्ष | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| | (अ / ब / क / त-१/ड) | | १ ते |

आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- १०/१२/२०१२.

## मा. स्थायी समिती सभा

**सभा सूचना क्र. :- ०१ दिनांक १०/१२/२०१२**

**प्रति,**
**सन्मा. श्री./श्रीमती.** ------------------------------------------------

स्थायी समिती सदस्य/सदस्या,
मिरा भाईंदर महानगरपालिका

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा सोमवार दि. १७/१२/२०१२ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. ०१, दि. १०/१२/२०१२ रोजीच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. तरी सदर सभेस उपस्थित रहावे, हि विनंती.

(वासुदेव शिरवळकर)
प्र. नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

**सोबत :-**

१) सभापती निवडणूक कार्यक्रम
२) नामनिर्देशन पत्र

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्थायी समिती सभा सुचना क्रमांक ०१, दि. १०/१२/२०१२ सोबतची विषय पत्रिका
सभा सोमवार दि. १७/१२/२०१२

| प्रकरण क्रमांक | विषय |
|---|---|
| -- | इतिवृत्तांत - निरंक |
| -- | समित्यांचे ठराव - निरंक |
| -- | आयुक्तांकडील पत्रे व कामकाज |
| ०१ | मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम २१ पोटकलम (१) अन्वये सन २०१२-१३ या सालाकरिता मा. स्थायी समितीवर असणाऱ्या सदस्यांपैकी एका सदस्याची सभापती स्थायी समिती म्हणून नेमणुक करणेबाबत. |

दिनांक :- १०/१२/२०१२.

(वासुदेव शिरवळकर)
प्र. नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

## [illegible] मा. स्थायी समिती सभापती पदाकरिता निवडणूक कार्यक्रम.

| वार / दिनांक | तपशिल |
|---|---|
| बुधवार<br>दि. १२ डिसेंबर २०१२<br>(दुपारी ३.०० ते सायं. ५.०० वाजेपर्यंत) | सन २०१२-१३ कालावधीकरीता मा. स्थायी समिती सभापती पदाचे नेमणुकीकरीता नामनिर्देशनपत्र विहित नमुन्यात महापालिका सचिवांकडे कार्यालयीन वेळेत दाखल करणे. |
| सोमवार<br>दि. १७ डिसेंबर २०१२<br>सकाळी ११.०० वाजले नंतर | प्रत्यक्ष सभेचे कामकाज सुरु झाल्यावर ...<br>१) बोलविलेल्या विशेष बैठकीच्या अध्यक्षस्थानी विभागीय आयुक्त किंवा त्यांचा प्रतिनिधी असेल.<br>२) मा. स्थायी समिती सभापती पदासाठी प्राप्त नामनिर्देशन पत्रांची छाननी व उमेदवारी मागे घेणे.<br>३) कोणत्याही उमेदवारास पुर्ववर्ती पोटनियमान्वये यथोचितरित्या नामनिर्देशित पालिका सदस्यांचे नाव वाचून दाखविल्यानंतर १५ मिनिटांच्या आत त्याने सही केलेली लेखी नोटीस पिठासीन प्राधिकाऱ्यांकडे देऊन त्याची उमेदवारी मागे घेता येईल.<br>४) पिठासिन प्राधिकारी आपली उमेदवारी मागे घेतलेल्या उमेदवारांची नांवे संबंधित स्थायी समिती सदस्यांस वाचून दाखवील.<br>५) मा. स्थायी समिती सभापती पदाचे निवडणूकीसाठी आवश्यकता भासल्यास हात वर करुन मतदान घेण्यात येईल.<br>६) निवडणूक लढविणाऱ्या प्रत्येक उमेदवाराला मतदानाद्वारे मिळालेल्या मतांची संख्या घोषित केल्यानंतर पिठासीन अधिकारी निकाल घोषीत करण्याची कार्यवाही करील. तद्नंतर उमेदवारांनी मिळविलेल्या मतांच्या संख्येनुसार चढत्याक्रमाने उमेदवाराची यादी तयार करील. ज्या उमेदवाराला मतदानात जास्त मते पडतील तो उमेदवार रितसर निवडून आल्याची घोषणा करण्यांत येईल.<br>७) मते समसमान मिळाल्यास पिठासीन अधिकारी असे घोषीत करील की, निवडणूकीचा निकाल चिठ्ठ्या टाकून सोडतीद्वारे सोडविण्यात येईल. उपस्थित आणि मत देण्यास हक्कदार असलेले स्थायी समिती सदस्य बहुसंख्येने ठरवतील अशा व्यक्तींकडून चिठ्ठी काढण्यात येईल.<br>८) ज्या उमेदवाराच्या नावाने चिठ्ठी निघेल तो उमेदवार उक्त पदावर वैधरितीने निवडून आला असल्याचे घोषीत करण्यांत येईल. |

(वासुदेव शिरवळकर)
प्र. नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

सचिव कार्यालय,
मुख्य कार्यालय,
मिरा भाईंदर महानगरपालिका, भाईंदर.
दिनांक :- १०/१२/२०१२

# मिरा भाईंदर महानगरपालिका, भाईंदर

## नामनिर्देशन पत्र

नमुना एक

[ नियम ३ (१) पहा ]

**मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभापती पदासाठी निवडणूक**

मी, याद्वारे ______________________ यांना मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या स्थायी समितीच्या सभापतीपदी निवडणूकीकरिता सभापती म्हणून नामनिर्देशित करीत आहे.

उमेदवाराचे पूर्ण नाव : ______________________

उमेदवाराचा टपालाचा संपूर्ण पत्ता : ______________________

______________________

______________________

उमेदवार हा नगरसेवक म्हणून जेथून निवडून आला त्या प्रभागाचा क्रमांक : ______________________

सुचकाचे पूर्ण नाव : ______________________

(सुचकाची सही)

अनुमोदकाचे पूर्ण नाव : ______________________

(अनुमोदकाची सही)

दिनांक :- / /२०१२.

## उमेदवाराचे प्रतिज्ञापत्र

मी, याद्वारे या नामनिर्देशनाला अनुमती देत आहे आणि माझी निवड झाल्यास, मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या स्थायी समितीचा सभापती म्हणून कार्य करण्याची तयारी दर्शवित आहे.

दिनांक :- / /२०१२.

(उमेदवाराची सही)

**कृपया मागे पहा**

**विशेष माहिती :-**

१. स्थायी समिती सभापती पदासाठी निवडणूक लढविण्याची इच्छा असलेला स्थायी समितीचा कोणताही सदस्य पालिका सचिवांकडे नामनिर्देशन जातीने सादर करील.

२. नामनिर्देशन पत्रात उमेदवाराचे पुर्ण नाव नमुद केलेले असेल आणि त्यावर एका स्थायी समिती सदस्याने सुचक म्हणून व दुसऱ्याने अनुमोदक म्हणून स्वाक्षरी केलेली असेल.

३. कोणताही स्थायी समिती सदस्य एकापेक्षा अधिक उमेदवाराची नामनिर्देशने सुचित करणार नाही किंवा त्यास अनुमोदन देणार नाही.

४. सभापती नियुक्ती करण्याकरिता सुचक किंवा अनुमोदक असणाऱ्या सदस्यास सभापती पदासाठी निवडणूक लढविता येणार नाही.

५. सुचक-अनुमोदकाने दिलेल्या जागी स्वतःचे संपूर्ण नांव लिहिले पाहिजे व तो स्थायी समितीचा सदस्य असला पाहिजे.

६. कोणत्याही उमेदवाराला एकापेक्षा अधिक नामनिर्देशनपत्रे सादर करण्यास प्रतिबंध केला जाणार नाही. परंतु असे की, कोणत्याही उमेदवाराकडून किंवा त्यांच्यावतीने चार पेक्षा अधिक नामनिर्देशनपत्रे सादर करण्यात येणार नाहीत.

| अ.क्र | सदस्यांचे नाव | फ्रंट / आघाडी |
|---|---|---|
| १. | श्री. बर्नड आल्बर्ट डिमेलो | राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी |
| २. | श्रीम. हेलन जॉर्जी गोविंद | राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी |
| ३. | श्रीम. अनिता पाटील | राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी |
| ४. | श्री. मुन्ना सिंह | राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी |
| ५. | श्री. राजु भोईर | राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी |
| ६. | श्री. प्रमोद जयराम सामंत | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस |
| ७. | श्री. राजेश शंकर वेतोस्कर | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस |
| ८. | श्रीम. बगाजी शर्मिला विल्सन | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस |
| ९. | श्री. रोहिदास शंकर पाटील | भारतीय जनता पार्टी |
| १०. | श्री. शरद केशव पाटील | भारतीय जनता पार्टी |
| ११. | श्रीम. मिरादेवी यादव | भारतीय जनता पार्टी |
| १२. | डॉ. राजेंद्र जैन | भारतीय जनता पार्टी |
| १३. | सौ. सिमा जैन | भारतीय जनता पार्टी |
| १४. | श्री. संदिप पाटील | शिवसेना |
| १५. | श्री. प्रविण पाटील | शिवसेना |
| १६. | श्री. प्रशांत दळवी | शिवसेना |